रे.के.नं. ९३/२०२३
नि.क्र.३१/क

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | मोहोम्मद खैरूल शेख |
| वय | - | ४० वर्षे |
| व्यवसाय | - | मजुरी |
| राहणार | - | वडखळ, ता. पेण, जि. रायगड. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. चव्हाण यांच्याद्वारे**

१. सन २०२३ मध्ये मी फुंडे गाव येथे मेहेर फाउंडेशन येथे पाइपलाइनचे ड्रिलींगचे काम करत होतो. दिलीप पांडे व रतन गुप्ता हे त्यावेळी मॅनेजर होते. प्रोजेक्ट मॅनेजर म्हणुन महेश कोळी होते. घटना ही दिनांक १९.०१.२०२३ रोजी घडली होती. सकाळी ०८.०० वाजताचे सुमारास मी कामाला गेलो होतो. ०९.०० वाजताचे सुमारास प्रकाश नारायण म्हात्रे तेथे आला व काम बंद करा असे म्हणाला. तसेच तेथे त्यावेळी बरेच मजुर सुद्धा हजर होते. त्यावेळी तेथे साइट मॅनेजर दिलीप पांडे हजर होते. प्रकाश म्हात्रे याने मराठी भाषेत काम बंद करा अशा प्रकारचे शब्द म्हटले होते. मी हिंदी भाषीक असल्याने तो इतर काय बोलला ते मला पुर्णपणे समजले नाही. तो साईट मॅनेजर सोबत बोलत होता. तो मटेरियल सप्लाय करण्याचे काम मिळण्याची मागणी करत होता. परंतु साईट मॅनेजर याने त्याला काम दिले नाही. मॅनेजर यांनी पोलीसांना बोलावले होते व त्यानंतर तक्रार दाखल केली. त्यादिवशी तेथे आलेला व्यक्ती प्रकाश म्हात्रे याला मी ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. एस. पी. घरत यांच्याद्वारे**

२. मी सन २०२३ मध्ये फुंडे येथे काम करत होतो याबाबतचा कोणताही दस्त पोलीसांना मी दिला नाही. आमचे कामावर येण्याच्या व जाण्याच्या वेळेची नोंद

रजिस्टरवर घेतली होत होती. घटनेच्या पुर्वी मी आरोपीस ओळखत नव्हतो. घटनेच्या दिवसाच्या आधी आरोपी साईट मॅनेजरकडे सप्लायचे काम मिळण्यासाठी आल्याबाबतची घटना घडली किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. तो खडी व गिट्टी सप्लाय करण्याचे काम मागण्यासाठी आला होता. हे म्हणणे खरे नाही की, ते काम रस्त्याला लागुन चालु होते. हे म्हणणे खरे नाही की, ते काम गावातील लोकांच्या येण्याजाण्याच्या रस्त्याला लागून चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी तेथे गावातील इतरही लोक आलेले होते. घटनास्थळाच्या बाजुला मॅनग्रुव्हची झाडे होती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही करत असलेल्या जागेवर मॅनग्रुव्हची झाडे होती व ती तोडुन आम्ही तेथे काम करत होतो. प्रोजेक्ट मॅनेजर व साईट इनचार्ज तक्रार देण्यास गेले होते. हे मला माहित नाही की, प्रोजेक्ट मॅनेजर व साईट इनचार्ज यांनी मॅनग्रुव्हची झाडे तोडुन काम करत असल्याने गावकऱ्यांनी तहसिलदार व वनविभागाकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, गावातील लोक आम्ही करत असलेले काम चुकीचे करत असल्याचे सांगण्यासाठी नेहमी येत असत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

उरण,
दिनांक – १२/१२/२०२५

(एस.पी. वानखडे )
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण